ISBN 978-93-5346-532-2





# रयत शिक्षण संस्थेची वाटचाल आणि पद्मविभूषण मा. शरदरावजी पवारसाहेब यांचे देशाच्या विकासातील मौलिक योगदान



संपादक : प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर

रयत शिक्षण संस्थेचे

**महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय**

पनवेल, जि. रायगड – ४१० २०६

नॅक पूनर्मूल्यांकनात 'अ' दर्जा • मुंबई विद्यापीठाचा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार

Scanned with CamScanner

CamScanner

# अनुक्रमणिका


१. संपादकीय
प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर ७

२. प्रस्तावना
डॉ. अनिल पाटील, चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा ९

३. रयतेचा कोहिनूर : पद्मविभूषण मा. खा. शरदरावजी पवारसाहेब
प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर १३

४. मा. शरदरावजी पवारसाहेब यांचे समाजकारण आणि राजकारण
प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे १७

५. कृषी-औद्योगिक व ग्रामीण विकासाचे शिल्पकार : मा. खा. शरदरावजी पवार
डॉ. अनिलकुमार वावरे , प्रिं. डॉ. शिवलिंग मेनकुदळे १९

६. रयत शिक्षण संस्था : आधुनिक शिक्षणाची प्रयोगशाळा
डॉ. पांडुरंग भोसले २४

७. रयत शिक्षण संस्थेची महाराष्ट्राच्या प्रबोधन चळवळीतील वाटचाल
डॉ. अनिल बांगर २६

८. भारताचे माजी संरक्षण मंत्री मा. शरदरावजी पवारसाहेब
डॉ. अशोक आढाव, कु. प्रियांका आढाव २८

९. सहकार क्षेत्राचे क्रांतीसूर्य - शरद पवार
प्रा. सुचिता औंधकर ३०

१०. रयत शिक्षण संस्थेचे मोखाडा परिसरातील शैक्षणिक योगदान
डॉ. बलवंत मगदूम ३२

११. माणूसपण जपणारं दुर्मिळ व्यक्तिमत्त्व शरद पवारसाहेब
प्रा. चिंतामण धिंदळे ३४

१२. पवारसाहेब यांचे महिलाविषयक विचार
डॉ. रमेश पोळ ३६

१३. कर्मवीर भाऊरावांचा शिक्षकांबद्दलचा दृष्टिकोन
गणेश खैरे ३८

१४. कर्मवीरांचा वारसा जपणारे शरदचंद्रजी पवारसाहेब
डॉ.काशिनाथ सोलनकर ४०

१५. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे एक निष्ठावंत अनुयायी-कर्जतचे दादा पाटील
प्रा. भास्कर मोरे ४३

१६. शरद पवारसाहेब यांचे क्रीडाविषयक धोरण
प्रा. सारीका युवराज धनवटे ४६

CamScanner 11-26-2022 22.27.jpg

ISBN : 978 - 93 - 5346 - 532 - 2

प्रकाशन वर्ष : २०१९-२०२०

प्रकाशक :
प्राचार्य,
महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
पनवेल, जि. रायगड

फोन : ०२२-२७४५२६५१
ई-मेल : prinmpascpanvel@yahoo.co.in
वेबसाईट : www.mpasccollege.edu.in

अक्षरजुळणी : गौरव आर्टस्, डोंबिवली
मुद्रक : गौरव आर्टस्, डोंबिवली
मुखपृष्ठ संकल्पना : श्री. गौरव खांडेकर
मो. नं. : ९८३३१ ५३७२६

CamScanner

# रयत शिक्षण संस्थेची महाराष्ट्राच्या प्रबोधन चळवळीतील वाटचाल

डॉ. अनिल बांगर
को.ए.सो. लक्ष्मी-शालिनी महिला महाविद्यालय-पेढारी

**प्रास्ताविक :**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा जिल्ह्यातील काले या गावी सत्यशोधक समाजाच्या मेळाव्यामध्ये बहुजन समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी 'रयत शिक्षण संस्था' या नावाने एक शैक्षणिक संस्था स्थापन करण्यात यावी असा ठराव मांडला व तो एकमताने मंजूर झाला. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर काले येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज आपल्या प्रजेला 'रयत' म्हणून संबोधित. त्यामुळे ग्रामीण भागातील बहुजन समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थेला 'रयत शिक्षण संस्था' हे नाव सार्थ वाटते.

खालील प्रमुख उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेऊन रयत शिक्षण संस्थेने आपल्या शैक्षणिक कार्याला सुरवात केली :

- बहुजन समाजामध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे व ती वाढवणे.
- मागासलेल्या गरीब मुलांना मोफत शिक्षण देणे.
- निरनिराळ्या जातीधर्मातील विद्यार्थ्यांत प्रेमभाव निर्माण करणे.
- अयोग्य रूढींना फाटा देऊन खऱ्या विकासाचे वळण लावणे.
- एकीचे महत्त्व कृतीने पटवून देणे.
- सर्व मुले काटकसरी, स्वावलंबी, शीलवान व उत्साही बनवण्याचा प्रयत्न करणे.
- बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसारासाठी जरूर पडेल, तेव्हा संस्थेचे कार्यक्षेत्र वाढवणे.
- कमवा आणि शिका.

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कर्मवीर भाऊरावांनी केवळ क्रमिक शिक्षणच नव्हे तर समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची शिकवण विद्यार्थ्यांना दिली.

साताऱ्यात भाऊराव पाटील यांनी एक मोठे वसतिगृह स्थापन केले. हे वसतिगृह चालवण्यासाठी त्यांच्या पत्नीस स्वतःचे मंगळसूत्र व दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी वसतिगृह व शिक्षणसंस्था चालविण्याचा यशस्वी प्रयोग केला. या कार्यात त्यांना त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांची अतिशय मोलाची साथ लाभली. २५ फेब्रुवारी १९२७ रोजी रयत शिक्षण संस्था नोंदणीकृत (रजिस्टर) झाली. याच साली साताऱ्यात भाऊरावांनी सिल्व्हर ज्युबिली ट्रेनिंग कॉलेज सुरु केले बडोद्याच्या सयाजीराव महाराजांनी भाऊराव पाटलांना साताऱ्यात हायस्कूल काढण्यासाठी ४००० रुपये दिले व बडोद्यात महाराजांच्या राज्यारोहणास साठ वर्षे झाल्यानिमित्त होणाऱ्या समारंभाचे आमंत्रण दिले.

त्या देणगीतून भाऊरावांनी देशातले 'कमवा आणि शिकवा' या पद्धतीने चालणारे पहिले 'फ्री ॲन्ड रेसिडेन्सिल हायस्कूल' सातारा येथे सुरु केले आणि त्याला नाव दिले 'महाराजा सयाजीराव हायस्कूल' यानंतर शाळांची मालिकाच महाराष्ट्रभर सुरु झाली. इ.स. १९४७ साली कर्मवीर भाऊराव भाऊराव पाटील यांनी साताऱ्यात 'छत्रपती शिवाजी कॉलेज' ची भर, इ.स. १९५४ साली कऱ्हाड येथे 'सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज' ची स्थापना केली. शाळा व महाविद्यालयांसाठी प्रशिक्षित शिक्षकांची उणीव जाणवू लागली, म्हणून त्यांनी प्रथम महात्मा फुले अध्यापक विद्यालय व पुढे इ.स. १९५५ मध्ये सातारा येथे मौलाना आझाद यांच्या नावाने 'आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन' सुरु केले. या सर्व शाळांच्या-महाविद्यालयांच्या व वसतिगृहांच्या स्थापनेमागे शिक्षणाचा प्रसार व त्यातून बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास हीच उद्दिष्टे भाऊरावांच्या डोळ्यासमोर होती. त्यांच्या एकूण कार्याचा आढावा घेतला असता. त्यांच्यावरील महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. महात्मा फुले गुरु मानूनच त्यांनी शैक्षणिक प्रसाराचे कार्य केले. प्रत्येक गावात शाळा, बहुजन समाजातील शिक्षक व शिक्षक प्रशिक्षणाच्या सूत्रांचा त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

रयत शिक्षण संस्थेने महाराष्ट्राला स्वतःला झोकून देणारे कार्यकर्ते देण्याच काम केले. प्रसंग कोणताही असो, स्वतःचे योगदान देण्याचा वसा संस्था आजही जपताना दिसून येते. या संस्थेच्या महान कार्यकर्त्यांमध्ये कर्मवीरांचे नाव तर आम्हांला घ्यावे लागेलच कारण, अण्णांना स्वतःचा मोठा भाऊ मानणाऱ्या वारणेच्या वाघानं म्हणजे सत्या भोसलेने फासावरती जात असताना, वनवासाला जाणाऱ्या रामाला भरताने ज्याप्रमाणे पादुका मागितल्या होत्या, त्याचप्रमाणे सत्या भोसलेने अण्णांच्या पायातल्या चपला मागितल्या. तेव्हांपासून अनवाणी पायाने शिक्षणाचा प्रसार करण्याचे काम कर्मवीरांनी केलं. घरातला एक माणूस जर कोणाच्या भक्तीला लागला, सेवेला लागला तर



Scanned with CamScanner

CamScanner

बाकीची माणसं टर उठवतात पण, अण्णांच्या संगतीत आलेल्या लक्ष्मीबाईंनी संस्थेत शिकणाऱ्या प्रत्येक पोराला माया लावण्याचे काम केले. प्रचंड सोवळे पाळणाऱ्या धर्मशील वहिनी, नंतरच्या आयुष्यात समाजसुधारणेच्या पुरोगामी बनल्या. रयत शिक्षण संस्थेसाठी कर्मवीरांनाच स्वतःचा बहुमोल दागिना मानून, स्वतः लंकेची पार्वती होऊन गोरगरिबांच्या मुलांच्या पोटात मायेचा घास भरवण्याचे काम वहिनींनी रयतच्या माध्यमातून केले.

कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेसाठी उजाड माळ घेऊन ज्ञानाचे मळे फुलवण्याचे काम केले. रयतेचा प्रत्येक विद्यार्थी काळ्या डोंगरांना टक्कर देणारा आणि सुरुंग लावणारा होता म्हणून समाज व्यवस्थेला जातीअंताची लढाई याच मुलांनी पूर्ण केली. आज रयत शंभराव्या वर्षात पदार्पण करते आहे, एखाद्या गोष्टीला खूप वर्षे झाली की लोक कंटाळतात आणि विसरून जातात पण रयत शिक्षण संस्थेवर असणारा लोकांचा विश्वास कायम आहे हे रयतेच यश आहे असं म्हणता येईल. संस्थेला उभा करण्यात अण्णांचे जेवढे योगदान आहे तेवढेच काम महाराष्ट्रातल्या समाजसुधारकांचे आहे. यात अग्रगण्य नाव घ्यावे लागेल ते राष्ट्रसंत गाडगेबाबांचे, अण्णांचा उल्लेख सातारचा दाढीवाला असं करणाऱ्या बाबांनी आणीबाणीच्या परिस्थितीत संस्थेला आधार देण्याचे काम केले, मोरारजी आणि खेरांनी संस्थेच अनुदान बंद केलं तेव्हा, त्यांचा कान धरण्याचे काम करून गाडगेबाबांनी रयतेला नवसंजीवनी दिली.

महाराष्ट्राच्या जनतेने भाऊराव पाटलांना 'कर्मवीर' ही पदवी देऊन गौरव केला. तसेच भारतीय केंद्रशासनाने त्यांना 'पद्मभूषण' पुरस्कार देऊन गौरवले. पुणे विद्यापीठाने त्यांची इ.स. १९५९ मध्ये सन्माननीय डी. लिट. ही पदवी दिली होती. ह.रा. महाजनी यांनी 'महाराष्ट्राचे बुकर टी. वॉशिंग्टन' या शब्दांत कर्मवीरांचे वर्णन केले आहे. सातारा येथे कर्मवीरांचे समाधीस्थान व कर्मवीर स्मृतिभवन आहे. तेथे भाऊराव पाटलांच्या स्मृति जतन करण्यात आल्या आहेत. अशा या शिक्षणाची गंगोत्री बहुजन समाजापर्यंत पोहोचवणाऱ्या आधुनिक भगीरथाची प्राणज्योत ९ मे १९५९ रोजी मालवली.

ग्रामीण भागातील मराठी शाळांमध्ये सेमी इंग्रजीचे वर्ग सुरु करण्याचा महाराष्ट्रात पहिला प्रयोग ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अनिल पाटील यांनी 'रयत' मध्ये प्रथम सुरु केला. यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली.

आज असाच एक नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणजे गुरुकुल प्रकल्प. जे घडावे पण घडत नाही, ते घडवून आणण्याचे सामर्थ्य शिक्षणात असते, परंतु संस्काराची निर्मिती करण्यात आजचे शिक्षण अपयशी ठरले आहे. शिक्षण वळण राहिले नसून दळण बनले आहे. विद्यार्थ्यांची संख्यात्मक वाढ झाली पण गुणात्मक वाढ होण्याची आवश्यकता भासू लागली आहे, म्हणून ग्रामीण भागातील होतकरू मुलांचा शोध घेऊन त्यांना सातारा शहरात सर्व शैक्षणिक सोयी उपलब्ध करून अध्यापकांच्या सान्निध्यात राहण्याची संधी निर्माण करून देण्यासाठी विद्यालयात स्कूल कमिटीचे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांच्या प्रेरणेने १९९० पासून महाराजा सयाजीराव विद्यालयात गुरुकुल प्रकल्प सुरु करण्यात आला. एक तुकडी आणि ६७ विद्यार्थ्यांसह सुरु केलेला हा प्रकल्प आता वटवृक्षाप्रमाणे विस्तारला असून, या प्रकल्पाचे यश पाहून संस्थेच्या अन्य शाखांतून अशा प्रकल्पाची उभारणी झाली आहे. स्थानिक परिस्थितीचा विचार करून संस्थेने निवासी, अनिवासी, दूरस्थ, मिनी गुरुकुल असे प्रकल्प सुरु केले आहेत. आज राज्यातील ३४८ शाळातील ८२१० विद्यार्थी गुरुकुल प्रकल्पामध्ये शिक्षण घेत आहेत.

शिक्षणाने व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला पाहिजे, केवळ यांत्रिकपणे काम करण्यासाठी विद्यार्थ्यांना तयार करण्याऐवजी त्यांच्यात स्वतंत्रपणे विचार करण्याची कुवत शिक्षणाद्वारे निर्माण झाली पाहिजे. शाळेत जे शिकवले जाते, ते विसरल्यानंतर विद्यार्थ्यांजवळ जे उरते ते खरे शिक्षण. शिक्षणक्षेत्राला पथदर्शी ठरणारा हा प्रकल्प सुरु करणाऱ्या संस्थेने काही मुलांना स्वयं अध्ययनाची सवय लावून आत्मविश्वास निर्माण करणे, शैक्षणिक दर्जा सुधारणे, स्वावलंबनाचे महत्त्व, अभिरुचीचा शोध घेणे, विद्यार्थ्यांमधील कला, क्रीडा, लेखन, वाचन, वक्तृत्व, नाट्य या गुणांचा विकास करणे. विविध शिष्यवृत्ती व शालेय स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेणे. शालांत परीक्षेत उज्वल यश संपादन करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे हे उद्दिष्ट आहे.

गुरुकुलसाठी गुणवत्ता यादीप्रमाणे विद्यार्थ्यांची निवड केली जाते. यासाठी सुसज्ज वर्ग, खोल्या, एल.सी.डी., संगणक, विज्ञान, गणित, भूगोल, प्रयोगशाळा, पुरेसे क्रीडा साहित्य, संगीत कला वर्ग या पायाभूत घटकांची पूर्तता केली जाते. कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत हा प्रकल्प राबविला जातो. त्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे तयार केली आहेत. सेमी इंग्रजी वर्ग सुरु करण्यात आले. मुलांसाठी सकाळी दोन तास व रात्री दोन तास अभ्यासिका घेण्यात येते. यामध्ये सकाळी एक तासाच्या अभ्यासासाठी पीपीटी व एलसीडी लॅबचा वापर केला जातो. कृतियुक्त अध्यापनावर भर दिला जातो. इंग्रजी संभाषण, गटचर्चा होतात. परीक्षेनंतर शिक्षकाकडून प्रश्नानुसार सूक्ष्मगुण मूल्यांकन करून लिखित मार्गदर्शन केले जाते. दररोज १० मिनिटे टीव्हीवरील इंग्रजी बातम्या पाहणे. आठवड्यात किमान एका इंग्रजी वर्तमानपत्राचे वाचन केले पाहिजे. इंग्रजी संभाषणासाठी संस्थेने दर्जेदार पुस्तके तयार केली आहेत. गुरुकुलच्या प्रत्येक विद्यार्थ्याकडून ग्रंथालयातील १२ निवडक पुस्तकांचे अवांतर वाचन करून त्याची नोंद ठेवली जाते. प्रत्येक वर्गावर किंवा विषयावर हस्तलिखिते तयार केली जातात. वक्तृत्व स्पर्धा, तज्ज्ञांची व्याख्याने, क्षेत्रभेट, व्यवस्थान मार्गदर्शन, कार्यशाळा स्नेहसंमेलन यांचे आयोजन केले जाते. गुरुकुलच्या विद्यार्थ्यांची मानसिक क्षमता चाचणी, बुद्ध्यांक चाचणी घेण्यात येते.

• • •



Scanned with CamScanner